Impact Factor - 0.241 | Special Issue - I June 2021 | ISSN 2250 - 0383



Itihas Sankalan Patrika

# SHODHANKAN

**International Half Yearly Peer Reviewed Referred Research Journal**

Special Issue on

## Ancient Indian Iconography & Architecture

Organized by

Sarda Education Society (Trust)'s

(A Linguistic Minority Educational Institute)

**SMT RADHABAI SARDA ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**

**ANJANGAON SURJI - 444705, DIST - AMRAVATI (Maharashtra)**

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)

Executive Editor
Dr Nitin Ulhasrao Saraf

Guest Editor
Dr Arvind Sontakke

Guest Publisher
Dr Bashisth Choubey
Principal

# कामशिल्पांचा संगीत शिल्पांशी अनुबंध

**डॉ अरविंद सोनटक्के ,**
दिगबर बिंदू महाविद्यालय,
भोकर, जि नांदेड
Email ID - arvindsontakke72@gmail.com

**श्री किशोर बोरकर**
सशोधक विद्यार्थी
Email ID - kishorborkar_j@rediffmail.com



मदिरावरील कामशिल्पा शेजारीच नृत्य-वादन करणाऱ्या सगीत शिल्पाना स्थान देण्यात आलेले दिसून येते या सगीत शिल्पामध्ये नृत्य करणाऱ्या ललना, मृदग, बासरी वाजवणारे स्त्री-पुरुष आदी प्रामुख्याने अंकित केलेले असतात मदिरावरील शिल्पपटाचा अनुक्रम व त्याची रचना पाहता कामशिल्पाच्या पट्टीतच आगेमागे नृत्य वादन करणारी ही मडळी आपल्याला आढळून येतात त्यामुळे काम आसनाच्या जवळ याचे असणे हे तात्कालीन सामाजिक तसेच धार्मिक अभिव्यक्तीचे मापन असल्याचे दिसून येते

**उद्देश -**

1) नृत्य शिल्प आणि काम शिल्पाचा परस्पर सबध स्पष्ट करणे

**संशोधनाची पद्धती -**

3) प्राथमिक व दुय्यम सदर्भ साहित्य व छायाचित्र याचा उपयोग सशोधन साहित्य म्हणून केला आहे

**कीवर्ड्स:-**

नृत्य शिल्प, काम शिल्प, काम सभोग

दहाव्या शतकातील 'शिल्पप्रकाश' (कुळकर्णी 2000 7) या वास्तुशास्त्रा वरील ग्रथात "शकराच्या देवळावर पचकर्माच्या बाधकामात वसताच्या वर अर्ध्याभागी कमळाच्या आकाराचा डमरू करावा व असे पीठ केल्यावर सुदर परिचारिका, चामर धारिणी, निरनिराळी वाद्ये घेतलेल्या मृदग वाजवणाऱ्या अशा मनोरम कन्या स्थापित कराव्यात" असा उल्लेख केला आहे (कुळकर्णी 2000, 88) याच आवर्तनात या ग्रथात मदिराच्या पिठा वर दुर्लभ अशी कामशिल्पे निर्माण करावीत असेही म्हटले आहे काम क्रीडेच्या कले शिवाय असलेले शाक्त मदिर सिद्धी न देणारे असते असेही येथे ठासून सांगितले आहे (कुळकर्णी 2000, 85)



भारतात सर्वदूर मदिराच्या बाह्यागावर व काही ठिकाणी अतरगात देखील कामशिल्पे व त्याच्या अनुबधाने सगीत नृत्य करणारी शिल्पे कोरलेली दिसतात महाराष्ट्राचा विचार करता ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील मंदिराच्या बाह्यागावर तान्त्रिक स्वरूपाची कामशिल्पे कोरण्यात आली आहेत या मंदिराचे निर्माण इ स 1060ला शिलाहार राजा मुम्मुनिराज यानी केल्याचा शिलालेखात उल्लेख आहे (जामखेडकर 2008 133)या मदिरावरील कामशिल्पाशेजारी वादन व नृत्य करणाऱ्या नर्तकींना कोरण्यात आले आहे त्याना खेटून असणाऱ्या एका कामशिल्पात एक स्त्री उभ्याने पुरुषाचे लिग हाताने उद्दीपित करून तिच्या पार्श्वभागकडे ओढताना दिसते आहे

नादेड जिल्ह्यातील मुखेड येथील दशरथेश्वर मदिरावरील तोरणव्दारावरच कामशिल्पाचे अकन केलेले आहेत तेथे देखील त्या शेजारी पहिला क्रम आरक्त नर्तकीचा लावण्यात आलेला आहे या द्वारवरील मुख मैथुनाचे शिल्प सभोगाच्या उत्कट क्रियेचे दर्शन घडवते हे मदिर अकराव्या शतकात निर्माण करण्यात आलेले आहे (जामखेडकर, 2008 173)

अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी येथील भवानीमाता मदिराच्या छतावर कामशिल्पाच्या सान्निध्यातसगीत नृत्य शिल्पे कोरण्यात आली आहेत या मदिराचे बाधकाम इ स 1177 मध्ये झाले (तुळपुळे 1963, 376) सद्यस्थितीला येथील कामशिल्पे पूर्णताझिजून गेलेली आहेत त्याना पाहता ती लतावेष्टीत कामक्रीडेच्या प्रकारातील असावीत असे दिसते

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील गोंदेश्वर मदिर 12 व्या शतकाच्या मध्यात निर्माण झाले असावे (जामखेडकर, 2008, 138) यादव स्थापत्याचा प्रभाव या मदिरावर दिसतो मंदिराच्या सभामंडपातील एका स्तभावर कामशिल्प कोरण्यात आले आहे त्या कामशिल्पाला देखील नर्तकीचे कोंदण देण्यात आले आहे

तेराव्या शतकातील बुलढाणा जिल्ह्यात लोणार येथील दैत्यसूदन मदिराच्या बाह्य अगावरील काम शिल्पाना देखील सगीत नृत्यशिल्पाचे सान्निध्य लाभले आहे येथील कामशिल्पे भग्नावशेषतील असली तरी सगीत नृत्य शिल्पे मात्र अजूनही सजीव भाव असलेली दिसून येतात

आध्र प्रदेशातील गुटूर जिल्ह्यातील मछरेलगावात वीरभद्र स्वामींचे मदिर आहे या मदिराच्या कुपणाच्या भितीवर कामक्रिडेचे चित्रण केलेले आहे हे चित्रण त्याची शैली बघता चौदाव्या शतका नतर केले गेले असण्याचा कयास लावता येतो यापैकी एका कामचित्रणात पलगावर सभोग करणाऱ्या जोडप्या शेजारी नर्तकीचे चित्रण केले आहे

सगीत, नृत्य हा योगाचा भाग असल्याचे भारतीय तत्त्वज्ञानात मानले जाते याची साधना करणारा आनदप्राप्ती करतो 'एशियन ट्रॅडिशनल थिएटर अँड डान्स' या आपल्या लेखात हेलसिग थेटर अकॅडमीचे डॉ झुका मेटीनेन यानी यावर प्रकाश टाकला आहे



कामसभोगाला देखील योग समजण्यात आले त्यातून मोक्षप्राप्तीचा एक गूढ विचार मदिरावरून अभिव्यक्त झालेला आपल्याला दिसतो दहाव्या शतकात धनजयने 'दशरूपकम' या नाट्यशास्त्र वरील ग्रथाची रचना केली त्यात तो सभोगाला शृगार म्हणतो जेव्हा रम्य अशा कलेच्या सान्निध्यात युवक युवतीचे मिलन होते तेव्हा त्याला शृगार म्हटले जाते असे त्यानी उद्धृत केले आहे (शास्त्री, 1987, 365)

'रतिरहस्यात' कोकोकने पाचव्या प्रकरणात स्त्री व माणसाचा अनुबध तयार होण्यासाठी ज्या घटना सागितल्या आहेत त्यात शिकार, नृत्य, सगीत याला स्थान दिले आहे याच्यामुळे स्त्री पुरुषात जो अनुबधतयार होईल त्याला त्यानी प्रेम म्हटले आहे (उपाध्याय, 1965, 43) या वरून कामशिल्पे व सगीत, नृत्यशिल्पे याचा परस्पराना पूरक असा सबध दृढ होताना दिसतो मदिरातील नृत्य वादन करणारी कलावत या काम प्रक्रियेशी सबधित होती असाही एकपैलू यातून उलगडतो

महाराष्ट्रातील प्राप्त काही ताम्रपट व शिलालेखातून मदिराना रगभोग म्हणजे नृत्य वादनासाठी दान दिल्याचे दिसून येते नाशिक जिल्ह्यातील अजनेरी येथे हरिश्चद्र भोगशक्तीने इ स 710-711 मध्ये आठ गावे दान दिल्याचा उल्लेख आहे ताम्रपत्रात कोरलेल्या या लेखात मदिराच्या पूजाअर्चा व नृत्य, सगीत मनोरजनासाठी ही गावे दान दिल्याचा उल्लेख केला आहे (मिराशी, 1955, 146)

सागली जिल्ह्यात इस्लामपूर तालुक्यातील चिकुर्डे येथे उत्तर चालुक्यानी जमीन दान दिल्याचा उल्लेख ताम्रपत्रात करण्यात आला आहे हे दान इ स 1154 मध्ये कलाकार व देवदासींच्या चरितार्थासाठी देण्यात आलेले आहे (तुळपुळे, 1963, 139)

सागली जिल्ह्यातील जत तालुक्यात मडगुहाल येथील महादेव मदिर जवळील शिलालेखा नुसार काही जमीन नाट्य व करमणुकीकरिता दान दिल्याचा उल्लेख आहे हा शिलालेख 27 जानेवारी इ स 1172 कोरला गेला आहे कलचुरी राजा सोइदेव शकम्मा व यादव बिल्हन यानी हे दान दिले आहे (बरनेट, 1919, 315)

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मडरूप येथील मारुती मदिराच्या पुढ्यात एक शिलालेख प्राप्त झाला आहे पाचवा यादव बिल्हमा याने सिन्नी नदीकाठचे अकलूज हे गाव सगीत वाद्य वाजवणारे व नृत्य करणाऱ्यासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे हे दान इ स 4 सप्टेंबर 1187 ला देण्यात आले आहे (रित्ती- कुभार, 1988, 158-159)

कोल्हापुरातील शिरोळ तालुक्यात खिद्रपुर येथे कोपेश्वर महादेव मदिर वरील शिलालेखानुसार रग भोगासाठी कुरुदवाडी गाव दान दिल्या गेले आहे हे दान यादव राजा सिघनदेव याने इ स 1224 मध्ये दिले आहे (फ्लिट, 1876, 9)

राजस्थान येथील सादादी बनोडाल या मदिरावरील शिलालेखानुसार देवदासीचे राजाकडून प्रभावीपणे सचलन केले जायचे असे दिसते हे शिलालेख इ स 1090 या काळातील आहेत या शिलालेखा नुसार मदिराच्या यात्रे दरम्यान इतर मंदिरातील सर्व नृत्य करणाऱ्या मुलींनी आकर्षक पेहराव करून नृत्य समारभात भाग घ्यावा असे नमूद केले गेले आहे भविष्यात देखील वृद्ध, वुध्दीवत, धर्मगुरूनी या प्रथेला विरोध दर्शवला तरीही प्रथा नियमित ठेवण्यात यावी असेही यात नमूद केले आहे (इ आय खंड 9, 26)

सोमनाथ मंदिराच्या आधीन दहा हजार गावे पाच हजार नृत्यागना होत्या (देसाई, 1975, 158) गुप्तोत्तर काळात मदिराचे मुख्य पुजारी पाशुपत व काला मुख पथाचे राहू लागले दक्षिण महाराष्ट्रात याचा प्रत्यय आपल्याला दिसून येतो त्याची कामभोगाची सृजनाशी निगडीत तत्वे मंदिराला भोगासक्त व कामलोलूप ठरवू लागली असे स्पष्ट मत देवागणा देसाई यानी व्यक्त केले आहे चौदाव्या शतकातील मेरुतुग आपल्या 'प्रबधचितामणी' या ग्रथात सोलकी राजा मुलराजाला अनहीलवरपट्टन येथील मदिरासाठी पुजाऱ्याच्या विलासी मागण्याना सामोरे जावे लागल्याची नोद करताना दिसतो एका धर्मगुरूनी राजाला नकार दिल्यानतर त्याच्या शिष्यानी पुजारी होण्यास काही अटींवर मान्यता दिली त्यात आठ पाल केशर, चार पाल कस्तुरी, 32 वारागना आदी दिल्यास तो पुजारी होण्याचे स्वीकृत करेल असे नमूद केले आहे (देसाई, 1975, 160)

**निष्कर्ष -**

या सर्वांचा मेळ घालता सगीत नृत्य शिल्प व कामशिल्प परम्पराशी निगडित ठरतात. मदिरातील नृत्य, वाद्यवृदाचे तांत्रिक पूजेत सहभागी होण्याचे सकेत देखील या शिल्पांच्या विषय वस्तूमुळे प्रदर्शित होते. नृत्य वादन करणाऱ्यांची राजा दान देऊन भरण-पोषणाची व्यवस्था पाहत असल्यामुळे या प्रथेला व क्रियेला राजाश्रय होता हेही यातून प्राबल्याने दिसते.

**संदर्भसूची**

1) एपिग्राफीया ऑफ इंडिका, 1911-12, खंड-11, पृष्ठ-26-28, ए एस आय दिल्ली
2) उपाध्याय एच. सी.,1965, रतिरहस्य ऑफ पडित कोकोक, तारापोरवाला सन्स अँड कपनी प्रायव्हेट लिमिटेड, मुबई
3) कुळकर्णी र. पू., 2003, शिल्प प्रकाश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सस्कृती मडळ, मुबई
4) जामखेडकर अ. प्र., 2008, स्थापत्य व कला खड एक भाग दोन, सास्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन
5) तुळपुळे एस. जी., 1963, पृष्ठ-319-326, प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन पुणे
6) देसाई देवांगणा; 1975, ईरौटीक स्कल्पचर्स ऑफ इंडिया अ सोशो कल्चरल स्टडी टाटा मॅग्रा हिल्स, दिल्ली
7) फ्लिटजे. एस., 1876, जर्नल ऑफ बॉम्बे ब्राच ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी, पृष्ट- नऊ, दहा
8) बग्नेट एल. डी., 1919-20, मादागिहार इस्क्रीप्शन्स, एपिग्राफीया ऑफ इंडिका, भाग-15, क्रमाक 20, पृष्ठ-315, 328
9) मिराशी व्ही. व्ही., 1977, इस्क्रीप्शन ऑफ शिलाहार, कॉर्पस इस्क्रीप्शन इंडिकम, भाग- सहा, पृष्ट 235, 239 ए एस आय दिल्ली
10) रित्ती एस. अँड कुभार आनद, 1988, इस्क्रीप्शन्स फ्रॉम सोलापुर, श्रीहरी प्रकाशन, धारवाड
11) शास्त्री श्रीनिवास, 1987, श्री धनजय विरचित दशरूपकम, प्रकाशक रतिराम शास्त्री, मेरठ